**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info  Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक — वेतन - २०१७/अशा.महा./०९/वेतनपथक, पुणे दिनांक — ०८ नोव्हेंबर, २०१७

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,
विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

२. कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे

**विषय - वेतन अनुदान माहे नोव्हेंबर, २०१७.**

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील माहे नोव्हेंबर, २०१७ चे वेतन अनुदानाचे एचटीई सेवार्थ प्रणालीमधील मधील देयक आणि विवरणपत्र १ ते ७ मधील माहिती तयार करुन सदरहू माहिती खाली नमूद केलेल्या दिनांकास, वेळेत याच कार्यालयात सादर करण्यात यावी.

| अ.क्र. | जिल्हा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | १४/११/२०१७ | सकाळी १०.३० ते दुपारी २.३० पर्यंत |
| २ | पुणे जिल्हा | १५/११/२०१७ | |
| ३ | अहमदनगर | १६/११/२०१७ | |
| ४ | नाशिक | १७/११/२०१७ | |
| ५ | अकृषी व अभिमत विद्यापीठे | १५/११/२०१७ | |

**तसेच ज्या कर्मचा-यांचा समावेश अजूनही एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये करण्यात आलेला नाही त्या कर्मचा-यांचेदेखील वेतनपत्रक स्वतंत्ररित्या सादर करावे.**

माहे नोव्हेंबर, २०१७ चे वेतन देयक सादर करतांना अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजनेसाठी (डी.सी. पी. एस.) कर्मचा-यांची ऑक्टोबर, २००९ या महिन्याची कपात करावयाची असून त्यासाठी **महागाई भत्त्याचे २७ टक्के दराने परिगणन करावे.**

माहे नोव्हेंबर, २०१७ चे वेतन देयक सुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणा-या कर्मचा-यांचे बाबतीत महागाई भत्त्याच्या १३६ टक्के दराने परिगणित करण्यात यावे.

**या कार्यालयाने एचटीई सेवार्थमध्ये जी पी एफ अकाऊंट हेड दुरुस्त करण्याबाबत मार्गदर्शन केलेले आहे. त्याप्रमाणे माहे नोव्हेंबर, २०१७ चे वेतन देयक सादर करतांना आपल्याशी संबंधीत जी पी एफ अकाऊंट दुरुस्त करुन या कार्यालयास देयक सादर करावे.**

उपरोक्त सर्व बाबी लक्षात घेऊन तसेच वरील विवरणपत्र आणि वेतन देयकासाठीची एचटीई सेवार्थ प्रणालीमधील **Outer** ची प्रत आणि **०१, ०२, ०५, ०६** या विवरणपत्राची माहिती Microsoft Excel मध्ये Times New Roman या फॉन्टमध्ये विवरणपत्रे तसेच माहे ऑक्टोबर, २०१७ चे वेतनापेक्षा माहे नोव्हेंबर, २०१७ चे वेतनामध्ये बदल झालेले असल्यास वेतननिश्चितीचे आदेश तसेच बदली आदेश आणि रुजू आदेश याची माहिती सादर करण्यात यावी. तसेच **वेतन देयकासोबत खालील उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.**

**उपयोगिता प्रमाणपत्र**

**प्रमाणित करण्यात येते की खाली नमूद केलेली माहिती अचूक असून त्याची खात्री मी स्वतः यासाठीच्या आवश्यक असणा-या सर्व नोंदवहया तपासून करुन घेतली आहे. यामध्ये काही चुक आढळल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील.**

| अ. क्र. | महिना | तपशील | सहसंचालक पुणे यांचेकडून बँक ऑफ महाराष्ट्रच्या वेतन खात्यामध्ये जमा केलेली रक्कम | प्रत्यक्ष वितरीत रक्कम | शिल्लक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | | | | | | |
| ०२ | | | | | | |
| | | **एकूण** | | | | |

तरी उपरोक्त बाबी विचारात घेऊन वर नमूद केलेल्या तारखांना आपण आपले महाविद्यालय/अकृषी आणि अभिमत विद्यापीठाचे माहे नोव्हेंबर, २०१७ चे वेतन देयक न चुकता सादर करावे.

**सही/-**
(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे